पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८००/२०१३
दिनांक- २६/०७/२०१३

प्रति,

मा........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ३०/७/२०१३ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ३०/७/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक-७१

दिनांक- ३०.७.२०१३ वेळ- दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ३०/७/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) निविदा नोटिस क्र. 1/46/2011-12, प्रभाग क्र. 71 मधील झोपडपट्टीक्षेत्रातील रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे यास मान्यता मिळालेली आहे. सदर कामास मा.स्थायी समिती क्र. 2893 दि. 22/2/2013 अन्वये मान्यता मिळाली असून सदर ठरावामध्ये विषयांकीत कामास निविदा अटीप्रमाणे नगरसचिव यांचेकडे पत्र क्र. झोनिपु/स्था/नि/कावि/153/2013 दि.11/02/2013 अन्वये विषयपत्रामधील मजकूरातील डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील हा भाग नजरचुकीने आलेला नाही. तरी याप्रमाणे सदर ठराव दुरूस्त करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/७/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२०१२-१३ मधील अ.क्र.६ अन्वये, भोसरी सर्व्हे नं.१३१ जुना कचरा डेपो येथे उद्यान विकसीत करणे कामी मे.सुरज कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रु.४६,५६,३८२/- (अक्षरी र.रु.शेहचाळीस लाख छपन्न हजार तीनशे ब्याऐंशी) पेक्षा २२.०८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.३८,०९,६६५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ३०/७/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १०/०७/२०१३ ठराव क्र.४ नुसार, नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला व मुलांसाठी विविध प्रकारच्या

कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यापैकी महिलांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण योजना ही योजना देखिल यापुर्वी राबविण्यात आलेली आहे. सदर योजने ऐवजी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम म्हणुन योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत असुन, यापुर्वी महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण या योजनेचे मोठया प्रमाणावरील कामकाज हे मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे या संस्थेने चांगल्या प्रकारे केलेले असल्याने तसेच विशेषकरुन पिं.चिं.म.न.पा.तील वस्तीपातळीवरील कामकाजाचा अनुभव सदर संस्थेस भरपुर असल्याने व एकुणच कार्यपध्दती व अनुभव, पुरेसे मनुष्य बळ, मोठया प्रमाणावरील कामकाज करण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक क्षमता यांचा विचार करता मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांना चालु वर्षाचे म्हणजेच दिनांक ३१/०७/२०१४ अखेरपर्यंतच्या कालावधीत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम वस्तीपातळीवर राबविणेकामी मान्यता देण्यात येत आहे. संस्थेचे काम हे महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम आयोजित करणे हे असुन संस्थेने विषयानुरुप दिलेले दर हे फक्त त्याचसाठी जरी असले तरी महिलांच्या सबलीकरणासाठी सक्षमीकरणासाठी, त्यांच्या ज्ञान व कौशल्यात वाढ व्हावी, कौटुंबिक आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी. हा सदर योजनेचा मुख्य उद्देश असुन सदर योजनेतुन म.न.पा.स कुठलाही आर्थिक नफा मिळविणे हा हेतु नाही. मात्र संस्थेमार्फत ज्ञान कौशल्य कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या महिलांना रोजगार/स्वयंरोजगारास प्रवृत्त करणे, त्यासंबंधीत व्यवसाय उभारणी ते विक्री, विक्री पश्चात सेवा तसेच जमा खर्च नोंदी, आवश्यक परवानगी/दाखले इत्यादीबाबत त्यांना मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील १६ वर्षे पुर्ण असणा-या महिला/मुलींना वास्तव्यार्थ /वयाचा पुरावा म्हणुन आधारकार्ड /मतदान ओळखपत्र /पॅनकार्ड/ रेशनकार्ड इत्यादी तत्सम कागदपत्र स्वीकारुन कुठल्याही उत्पन्न गटातील महिला /मुलींना कार्यक्रमास विषयानुरुप एकुण शुल्काच्या १० **%** रक्कम ही लाभार्थी सहभाग शुल्क म्हणुन भरुन घेऊन ३० महिलांच्या मर्यादेत गटप्रमुखांमार्फत फाईल सादर करुन कार्यक्रमात सहभागी करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सदर योजने अंतर्गत महिलांसाठी वस्तीपातळीवर महिला गटांच्या मागणीनुसार व वेळेत सदर कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे असुन,विषयानुरुप निश्चीत केलेल्या एकुण शुल्काच्या १०**%** रक्कम भरुन, यापुर्वी व्यवसाय प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेले असले तरी एक किंवा एकापेक्षा अधिक विषयांच्या सदर ज्ञान व

कौशल्य कार्यक्रमात महिला / मुलींना सहभागी करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे. विषयानुरुप अभ्यासक्रम पाहुनच व तो आपल्याला झेपेल याची खात्री वाटणा-या म्हणजेच तो कोर्स करण्याचे ज्ञान/कुवत/क्षमता असलेल्या गरजु महिलाच सहभाग शुल्क भरुन फाईल सादर करीत असतात. त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. त्यामुळे महिलांना त्यांचे इच्छेनुरुप ज्ञान कौशल्य कार्यक्रमास सहभागी होणेपासुन वंचित ठेवले/राहिले असे होणार नाही, केवळ शैक्षणिक अर्हतेतुन ज्ञानाची पातळी कळुन येत नाही. त्यामुळे कुठलीही गरजु / इच्छुक महिला ज्ञान कौशल्य कार्यक्रमापासुन वंचित राहु नये, कार्यक्रमात सहभागी करुन घेत नाही अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहु नये, या हेतुने कुठलीही/विशिष्ट शैक्षणिक अर्हता न ठेवता ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दिलेले विषय, कालावधी व दर यांस व प्रपत्र ब नुसार सदरची योजना मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत दि. ३१/७/२०१४ अखेरपर्यंतच्या कालावधीत विषयानुरुप एकुण कार्यक्रम शुल्काच्या १०% रक्कम ही लाभार्थी सहभाग शुल्क म्हणुन भरुन घेऊन महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमात लाभार्थ्यांना सहभागी करुन घेऊन योजना राबविणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे**

**महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम**

**प्रपत्र – अ**

| अ.क्र | विषयाचे नाव | कार्यक्रम कालावधी (दररोज २ तास) | एकुण शुल्क | लाभार्थी १०% सहभाग शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | स्पोकन इंग्लिश | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| २ | विक्री कलाकौशल्य (मॉल इ.) | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| ३ | अडव्हान्स गिफ्ट आर्टीकल्स निर्मिती (केमिकल | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | फ्लॉवर,सिरॅमिक फ्लॉवर पॉट, ग्लास पेंटींग, स्टेन ग्लास पेंटींग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग इ.) | | | |
| ४ | मोबाईल रिपेअरींग | ४५ दिवस | ३,१५०/- | ३१५/- |
| ५ | ब्युटी केअर ऍण्ड पार्लर मॅनेजमेंट | ६० दिवस | ४,५००/- | ४५०/- |
| ६ | फोटोग्राफी | ३० दिवस | ३,६००/- | ३६०/- |
| ७ | पेपर कन्व्हर्जन | ६० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| ८ | घरगुती उपकरणे दुरुस्ती (मिक्सर/इस्त्री/गॅस/फॅन इ.) | ३० दिवस | ४,१५०/- | ४१५/- |
| ९ | विविध प्रकारचे खाद्य पदार्थ तयार करणे | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| १० | व्हीडीओ शुटींग | ३० दिवस | ३,७००/- | ३७०/- |
| ११ | प्ले ग्रुप टिचर्स प्रशिक्षण | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| १२ | रुग्ण सेविका प्रशिक्षण | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |

(दिनांक ३०/७/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ४) मनपाचे नगररचना विभागाकडील मंजुर विकास योजनेव्यतिरिक्त मौजे वाकड येथील स.नं. २६० पै. मध्ये प्रस्तावित मूळा नदीवरील पूलाकरीता ३५.०० मी रूंदीचा रस्ता घोषित करणेबाबत जाहिर नोटीस मा. आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्ताव दि. ११/३/२०१३ अन्वये जनता संपर्क विभागाकडील जाहिरात क्र.३५५ नुसार दै लोकमत व दै टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात दि. २८/३/२०१३ नुसार प्रसिध्द करणेत आली. जनतासंपर्क विभागाकडील नियम व अटीनुसार सदरची सूचना दै.टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने ८० चौ.से.मी. इतक्या कमी जागेत छपाई केली असल्याने दै.लोकमत या वृत्तपत्राला तेवढ्याच चौ.से.मी. आकारमानाचे बील देय आहेत. दै.टाईम्स ऑफ इंडिया र.रू.३७८४०/- व लोकमत मराठी २,८८०/- एकूण ४०,७२०/- सदरची रक्कम उपरोक्त वृत्तपत्रास अदा करणे आवश्यक असलेने दै टाईम्स ऑफ इंडिया व दै लोकमत यांना अदा करावयाच्या र.रू. ४०,७२०/- (अक्षरी र.रू. चाळीस हजार सातशे वीस फक्त) या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) मनपाचे नगररचना विभागाकडील मौजे सांगवी-बोपोडी येथे मुळा नदीवर पुल बांधणेकामी मौजे सांगवी येथील स.नं.३ पैकी जागेत १८ मी रुंद रस्ता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये प्रसिध्द

करणेबाबत जाहिर नोटीस मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्ताव दि.२२/१२/२०१२ अन्वये जनता संपर्क विभागाकडील जाहिरात क्र.२५० नुसार दै.लोकसत्ता व दै.सकाळ या वृत्तपत्रात दि.८/१/२०१३ नुसार प्रसिध्द करणेत आली. जनता संपर्क विभागाकडील नियम व अटीनुसार सदरची सूचना दै.सकाळ या वृत्तपत्राने ५६ चौ.से.मी. इतक्या कमी जागेत छपाई केलेली असल्याने दै.लोकसत्ता या वृत्तपत्राला तेवढ्याच चौ.से.मी. आकारमानाचे बील देय आहेत. दै.सकाळ मराठी १२,६००/- व दै.लोकसत्ता मराठी १३,७२०/- एकूण २६,३२०/- प्रमाणे रक्कम उपरोक्त वृत्तपत्रास अदा करणे आवश्यक असलेने दै.लोकसत्ता व दै.सकाळ यांना अदा करावयाच्या र.रू..२६,३२०/- (अक्षरी र.रू.सव्वीस हजार तीनशे वीस फक्त) या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) स्थानिक संस्था कराची नोंदणी मनपाच्या आर्थिक हिताची असल्यामुळे व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कराची नोंदणी करावी यासाठी त्यांना पत्र देणे आवश्यक आहे तसेच ज्या व्यावसायिकांनी नोंदणी केलेली आहे त्यांना नोंदणी प्रमाणपत्रे पाठविण्याकरीता येणा-या पोस्टाचा खर्च हा तातडीची गरज, कालमर्यादा लक्षात घेऊन निवीदा/कोटेशन न मागविता, करारनामा न करता केलेली असल्याने या कामासाठी वरिष्ठ पोस्ट मास्टर पुणे प्रधान डाकघर पुणे-०१ यांना अदा केलेल्या आगाऊ रक्कम खर्चास व होणा-या प्रत्यक्ष खर्च र.रू.२,८०,०००/- रक्कमेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) वाय.सी.एम.रुग्णालयाचे डायलिसिस विभागामधील, "Gambro" कंपनीचे दोन डायलिसिस मशिनकरिता चार नग फिल्टर खरेदीकामी उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेल्या दरानुसार, थेट पध्दतीने निविदा न मागविता खरेदी करणेकामी करारनामा करणेस व त्यासाठी येणा-या र.रु.४१,६००/- (अक्षरी र.रु.ऐकेचाळीस हजार सहाशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मनपा क्रिडा विभागाकडील तक्ता क्रमांक १ मधील २ संस्था अनुदान अदा करणेस पात्र झाल्या होत्या. तसेच लेखापाल यांनी प्रस्तावात नमूद १ ते १४ सार्व. संस्थांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही असे कळविले असल्याने अपात्र ठरलेल्या आहेत त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व संस्था / मंडळे यांना अनुदान अदा करणेकामी खालील नमुद तक्ता क्र.१ मधील-

| अ.क्र. | सार्व.संस्था/मंडळांचे नांव | अनुदान र.रू. |
|---|---|---|
| १ | साई संस्कार संस्था, आकुर्डी | १,८९,२५२/- |

| | | |
|---|---|---|
| २ | सुकन्या मेडीकल फाऊंडेशन, राजनगर, से.नं.२२, निगडी ओटा स्कीम, निगडी, पुणे-४४. | ७,२४७/- |

या अ.क्र.१ ते २ सार्व. संस्था मंडळांना त्यांचे नांवापुढे नमूद केलेप्रमाणे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मा. आयुक्त यांच्या दि.२३/०१/२०१३ व ३०/०३/२०१२ मंजूर प्रस्तावान्वये अनुदान अदा करणेस मान्यता दिल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोबाइल धारकांना Bulk SMS द्वारे जनजागृतीपर SMS पाठविणेत येतात. भविष्यात वेगवेगळ्या कारणांसाठी जनजागृती करणेसाठी साधारणत: १ कोटी SMS पाठविणेबाबतचे काम निविदा मागवून करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी अंदाजे १५ लाख तरतूद आवश्यक असून ती संगणक विभागाकडील "ई-गव्हर्नन्स/ई-ऑफीस" या लेखाशिर्षावरून दूरसंचार विभागाचे "मनपाचे विविध अधिकारी/पदाधिकारी SMS द्वारे विविध कार्यक्रमांची माहिती देणे." या लेखाशिर्षावर र.रू.१५ लाख वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. २६/२/२०१२-१३ मधिल प्रभाग क्र. ९८ मधील आरक्षणाच्या जागा विकसित करणेकामी मे.निलेश उत्तमराव बोधले (नि.र.रु.२३,३४,२६७/- (अक्षरी र.रु. तेविस लाख चौतीस हजार दोनशे सदुसष्ट) पेक्षा १८.३६ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२०,००,९८०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ११) मुंबई-पुणे रस्ता पिंपरी चौक ते निगडी कर्बस्टोन फुटपाथचा रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणे या कामासाठी सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकात र.रु. ५० लाख तरतुद करणेत आली असुन, सदर कामाचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यामुळे सदर कामावर तरतुद केलेली संपुर्ण रक्कमेची गरज सध्या भासणार नाही. त्यामुळे सदर कामावरील र.रु. ५० लाख मधुन र.रु २० लाख वर्ग करता येणे शक्य असल्याने विशेष योजना पा.क्र. ४६ अ.क्र. १२२ वरील कामातुन र.रु २० लाख फक्त विशेष योजना पा. क्र. ४६ अ.क्र.११५ चे कामासाठी वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखा विभागातील सन २००८-०९ ते २०११-१२ या आर्थिक वर्षातील ताळेबंदपत्रक (Balance Sheet) तयार करणेकामी मा.आयुक्तसाहेब यांचेकडील दिनांक ०७/०६/२०१३ चे मान्य प्रस्तावानुसार फेरकोटेशन मागविण्यात आले आहे. त्यात १) मे.ए.एन. गावडे ॲन्ड कंपनी (चार्टर्ड अकांऊटंट) २) मे. सतिश नगरे ॲण्ड असोसिएट (चार्टर्ड अकांऊटंट) ३) मे. एम.पी.नवसारीकर ॲण्ड कंपनी (चार्टर्ड अकांऊटंट) यांचे कोटेशन प्राप्त झाले असून प्राप्त कोटेशननुसार सर्वात कमी दराचे कोटेशन मे. सतिश नगरे ॲण्ड असो. मुंबई ४०० ०६४ यांचे एकूण र.रु.१६,३०,०००/- चे दर प्राप्त झाले आहे. सदरचे दरास व येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मुंबई पुणे रस्ता दापोडी येथे हॅरीस ब्रिजला समांतर पूल बांधणे कामासाठी मे.कन्सलटींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इं) प्रा.लि. [CES (I) Pvt.] यांना प्रकल्प सल्लागार नेमणे व मा.स्थायी समिती ठराव क्र.४७१५ दि.२०/१२/२००३ च्या पूर्वमान्यदराने खालील तक्त्याप्रमाणे करून घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

| पूल व प्रकल्प | निविदापूर्व कार्य (निविदा स्विकृत रक्कम) | निविदेनंतरची कार्ये (निविदा स्विकृत रक्कम) |
|---|---|---|
| पूल व प्रकल्प | १.सर्वेक्षण – रू.१,१०,०००/-<br>२.नियोजन – रू.४५,०००/-<br>३.वाहतूक सर्वेक्षण – रू.४५,०००/-<br>४.निविदा कार्य – रू.२,००,०००/-<br>५.मृदू सर्वेक्षण – स्विकृत दरसूची + १५% | २% + ०.५% संकल्पचित्र तपासणीकरिता |

विषय क्रमांक- १४) कार्यालयीन कामकाजासाठी खालील अधिकारी/कर्मचारी यांस मोबाईल सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने अधिकारी/कर्मचारी यांस मोबाईल वापराची प्रतिमाह अधिकतम वापर मर्यादा त्याच्या पदासमोर नमुद केल्याप्रमाणे निश्चित करुन मोबाईल सीम सुविधा पुरविणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

| अ.क्र | पदनाम | संख्या | वापर मर्यादा र.रु. |
|---|---|---|---|
| १ | डॉक्टर्स | २ | ३००/- |
| २ | कनिष्ठ अभियंता | ५ | ३००/- |

विषय क्रमांक- १५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जनतासंपर्क विभागामार्फत विविध कारणास्तव विविध मान्यवरांचे तसेच मनपा अस्थापनावरील सेवानिवृत्त

होणा-या अधिकारी/कर्मचा-यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात येत असते. याकामी सत्कार साहित्य मध्यवर्ती भांडार विभागाकडून जनतासंपर्क कार्यालयास उपलब्ध होते. तथापी मध्यवर्ती भांडार विभागाकडील शाल पुरवठयाबाबतची निविदा कार्यवाही पूर्ण न झाल्याने जनतासंपर्क विभागामार्फत मे.स्टार फॅब्रीक्स, निगडी यांचेकडून क्रिम कलरच्या मध्यम प्रतीच्या ४८X९० साईजच्या ५१ नग शाली र.रू. १९८.५० या दराने तातडीने खरेदी करण्यात आल्या होत्या. याकामी र.रु. १०,१२४/- (अक्षरी र.रु. दहा हजार एकशे चोवीस फक्त) इतका खर्च झालेला आहे. सदरचा खर्च थेट पध्दतीने करण्यात आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १६) मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.७/२०१२-१३ मधील अ.क्र.१२ अन्वये, थेरगांव वॉर्ड क्र.८६ मध्ये मंडपाची व्यवस्था करणेकामी मे.साक्षी इंजिनिअर्स (नि.र.रू.८,४०,१४४/- (र.रू.आठ लाख चाळीस हजार एकशे चव्वेचाळीस) पेक्षा १७.८६ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १७) जलशुध्दीकरण से. २३ पाणीपुरवठा विभागातील "**इतर खर्च –"कार्यालयीन आकस्मिक खर्च**" या लेखाशिर्षावरुन र.रु.२३,०००/- एवढी रक्कम "बोनस तथा सानुग्रह अनुदान" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १८) मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/५/१८/ २०१२-१३ मधील अ.क्र.८ अन्वये, मोशी कचरा डेपो साठी उर्वरित सिमाभिंतीचे काम करणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. (नि.र.रु.१,३९,९९,०६८/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणचाळीस लाख नव्याण्णव हजार अड्डसष्ट) पेक्षा +७.०० % जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे सिमेंट, लोखंड यांचे मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १९) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/२०१२-१३ मधील अ.क्र.४ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा-१ व २ अंतर्गत पंपींग मशिनरीची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी

मे.फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन (नि.र.रु.४६,९६,१८०/- (अक्षरी र.रु. सेहेचाळीस लाख शहाण्णव हजार एकशे ऐंशी) पेक्षा ५.४९ % (सुधारित दर) कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २०) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१३-१४ मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.८१ काळेवाडी मधील आरक्षण क्र.६४० मध्ये प्राथमिक शाळा इमारत बांधणे (भाग-२) कामी मे.देव कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.२,३१,९५,२०३/- (अक्षरी र.रु.दोन कोटी एकतीस लाख पंच्यान्नव हजार दोनशे तीन) पेक्षा २०.०९ % जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू. २,७८,५५,११९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८००/२०१३
दिनांक - २६/०७/२०१३

टिप- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.